**दिन विशेष...**
१६४२ : इटली देशातील प्रख्यात शास्त्रज्ञ गॅलिलिओ यांचे निधन झाले.
१९०८ : बालवीर चळवळीस प्रारंभ.
१९४१ : लॉर्ड बेडन पॉवेल यांचा स्मृतिदिन.
✲ सोलापूरच्या कापडगिरण्या ताब्यात घेण्याचा केंद्राचा वटहुकूम निघाला.

# शौर्य मराठी
महाराष्ट्राचे निडर दैनिक
RNI-MAHMAR/2023/89125

सेन्सेक्स ८४,९६१.१४ -१०२.२०(०.१२%)
डॉलर ₹ ८९.८४

आजचे तापमान (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | २९ | १३ |
| दिल्ली | १७ | ०९ |
| मुंबई | ३४ | २० |
| नागपूर | २७ | १० |
| पुणे | २९ | १२ |

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | गुरूवार, दि. ८ जानेवारी २०२६ | वर्ष २ रे | अंक ६० किंमत : ५ रु. | पाने ४


**सुविचार**
जी वाणी सत्याला सांभाळते, त्या वाणीला सत्य सांभाळते

सुर्योदय - सुर्यास्त
स.-७:०६ संध्या-६:०१

**सोने – चांदी**
सोने(१० ग्रॅम) - चांदी (प्रति किलो)
१,४०,०१५/- २,४८,०००/-

**केळी भाव**
नवती : ७५१ ते ७७०
पिल बाग : २५१ ते २७०
कांदे बाग : ----

## थोडक्यात

### शेअर बाजारात सलग तिसऱ्या दिवशीही घसरण

**मुंबई ।** भारतीय शेअर बाजारातील घसरणीचे सत्र बुधवारी सलग तिसऱ्या दिवशीही कायम राहिले. जागतिक बाजारातून मिळणारे कमकुवत संकेत आणि गुंतवणूकदारांनी केलेली नफेखोरी यामुळे बाजारात विक्रीचा दबाव दिसून आला. मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक सेन्सेक्स आज १०२.२० अंकांनी म्हणजेच ०.१२ टक्क्यांनी घसरून ८४,९६१.१४ अंकांवर बंद झाला. त्याचप्रमाणे, राष्ट्रीय शेअर बाजाराचा निर्देशांक निफ्टीमध्येही ३७.९५ अंकांची म्हणजेच ०.१४ टक्क्यांची घसरण होऊन तो २६,१४०.७५ अंकांवर स्थिरावला. या आठवड्याच्या सुरुवातीपासून म्हणजे सोमवार आणि मंगळवारीही बाजार घसरणीसह बंद झाला होता, ज्यामुळे गुंतवणूकदारांच्या चिंतेत भर पडली आहे.

### व्हेनेझुएलानंतर आता इराण ठरणार लक्ष्य?

**वॉशिंग्टन ।** अमेरिकेने गेल्या शनिवारी पहाटेच्या सुमारास व्हेनेझुएलावर हल्ला करून राष्ट्राध्यक्ष निकोलस मादुरो आणि त्यांच्या पत्नीला ताब्यात घेतले आहे. यानंतर अमेरिकेतील एक प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ आणि धोरण विश्लेषक जेफ्री सॅक्स यांनी गंभीर इशारा दिला आहे. मदुरो यांना ताब्यात घेण्यासाठी केलेल्या कारवाईनंतर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प याचे पुढील लक्ष्य इराण असू शकते असे ते म्हणाले आहेत.भारतातील किमान दोन वृत्तवाहिन्यांशी बोलताना सॅक्स यांनी याबद्दलचे भाष्य केले आहे. सॅक्स म्हणाले की, इस्रायलला इराणचे वेड लागले आहे आणि त्यांनी असाही दावा केला की इस्रायलला हवे असलेले युद्ध अमेरिका लढतो.

# अजित पवार महाराष्ट्राचे ‘आका’

## ● ‘स्वतःचा भ्रष्टाचार लपवण्यासाठीच पवार भाजपसोबत आले’ : आमदार महेश लांडगेंचा घणाघात...

वृत्तसंस्था । पिंपरी

**‘उपमुख्यमंत्री, पालकमंत्री अजित पवार यांनी स्वतःच्या मुलाचा पराक्रम पाहावा. त्यानंतर आमच्यावर टीका करावी. पवार हे स्वतःचा भ्रष्टाचार लपवण्यासाठी भाजपबरोबर आले आहेत. तेच खरे महाराष्ट्राचे ‘आका’ आहेत, असा आरोप भाजपचे भोसरीचे आमदार महेश लांडगे यांनी केला आहे.**



पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणूक प्रचाराला सुरुवात झाल्यापासून उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी महापालिकेतील भ्रष्टाचारावरून आणि महापालिका कर्जबाजारी केल्यावरून भाजपच्या स्थानिक नेत्यांवर टीका करत आहेत, या पार्श्वभूमीवर आमदार महेश लांडगे यांनी ही टीका केली. आमदार महेश लांडगे म्हणाले, ‘स्वतःचा भ्रष्टाचार लपवण्यासाठी भाजपबरोबर आलेल्या अजित पवारांनी आमच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप करू नयेत. मला पिंपरी-चिंचवडचा ‘आका’ म्हणत आहेत, मुळात पवार हेच महाराष्ट्राचे ‘आका’ आहेत. पवारांनी स्वतःच्या लेकाचे पराक्रम पाहावे आणि ते स्वतः ‘आका’ आहेत, हे त्यांनी जाहीर करावे. ते नैराश्यातून आरोप करत आहेत.

आमच्यावरील भ्रष्टाचाराचे आरोप सिद्ध करायचे असतील, तर मी, महापालिका अधिकारी आणि अजित पवार यांनी समोरासमोर बसावे. मग सर्व उत्तरे मिळतील.

**अजित पवार यांनी केली होती टीका**

‘महापालिकेतील भ्रष्टाचाराचा ‘आका’ संपवणार आहे. मी कोणाच्या नादी लागणार नाही. विनाकारण माझ्या नादाला कोणी लागले, तर सोडणार नाही. ज्या गावच्या बोरी, त्या गावच्या बाभळी असतात. त्यामुळे कोणाला घाबरायचे नाही’, असे उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले होते.

**‘स्थायी समितीत काय करायचे ते केले आणि आमदार झाला’**

भाजपने महापालिका कर्जबाजारी केली. ठेवी मोडल्या आहेत. ४० हजार कोटी रुपयांची कामे कुठे झाली आहेत? याची उत्तरे द्यावीत. त्याला (महेश लांडगे) नगरसेवक, स्थायी समिती अध्यक्ष केले. स्थायी समितीत काय करायचे ते केले आणि आमदार झाला. आता संपत्ती कशी वाढली.

दादागिरी किती वाढली आहे, अशी टीका नाव न घेता आमदार महेश लांडगे यांच्यावर केली होती. त्याला आता लांडगे यांनीही उत्तर दिले आहे. त्यामुळे अजित पवार आणि भाजप आमदार महेश लांडगे यांच्यातील आरोप-प्रत्यारोप वाढले आहेत.

# उमेदवार पाडा अन् ७१ लाख जिंका!

## ● संतोष बांगर यांचं विरोधकांना ओपन चॅलेंज

वृत्तसंस्था । कळमनुरी

**आपल्या आक्रमक शैलीमुळे आणि विधानांमुळे नेहमीच चर्चेत राहणारे शिंदे सेनेचे आमदार संतोष बांगर पुन्हा एकदा एका मोठ्या पैजेमुळे प्रसिद्धीच्या झोतात आले आहेत. आगामी जिल्हा परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, त्यांनी कळमनुरी मतदारसंघात तब्बल ७१ लाख रुपयांची पैज लावत राजकीय वर्तुळात खळबळ उडवून दिली आहे.**



कळमनुरी विधानसभा मतदारसंघातील पिंपळदरी येथे यात्रेनिमित्त कुस्तीच्या मैदानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात बोलताना संतोष बांगर यांनी शिवसेनेचे स्थानिक कार्यकर्ते संजय भुरके यांना जिल्हा परिषदेची उमेदवारी जाहीर केली. इतकेच नाही तर, भुरके हे निवडणूक जिंकणारच असा ठाम विश्वास व्यक्त करत त्यांनी ७१ लाखांची पैज लावली आहे.

पुढील पाऊल टाकत बांगर यांनी विरोधकांना थेट आव्हान दिले की, ‘संजय भुरके यांना पराभूत करून दाखवा आणि माझ्याकडून ७१ लाखांचे इनाम घेऊन जा.’ भर मैदानात त्यांनी दिलेले हे ‘ओपन चॅलेंज’ आता राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरले आहे.

राज्यात सध्या महापालिका निवडणुकांचा प्रचार शिगेला पोहोचला आहे. काही ठिकाणी भाजप विरुद्ध शिंदे सेना असा सामना आहे, तर काही ठिकाणी ठाकरे सेना आणि मनसे युतीशी महायुतीची लढत आहे. या रणधुमाळीत संतोष बांगर यांनी जिल्हा परिषदेच्या जागेवरून लावलेली ही पैज राजकीय चर्चांना उधाण देणारी ठरली आहे.

# निवडणूक प्रशिक्षणास गैरहजर राहणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कडक कारवाई

## ● राज्य निवडणूक आयोगाचे आदेश

वृत्तसंस्था । मुंबई

**महानगरपालिका निवडणुकांसाठीचे मतदान आणि मतमोजणीकरिता पुरेशा प्रमाणात अधिकारी, कर्मचाऱ्यांची नियुक्ती करणे आवश्यक आहे. या सर्वांचे वेळेत प्रशिक्षणही पूर्ण झाले पाहिजे; तसेच प्रशिक्षणास गैरहजर राहणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात यावी, असे आदेश राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी दिले आहेत.**




महानगरपालिका निवडणुकांसाठी मतदान व मतमोजणीची तयारी आणि कायदा व सुव्यवस्थेसंदर्भात सर्व २९ महानगरपालिका आयुक्त, संबंधित पोलिस आयुक्त व जिल्हा पोलिस अधीक्षक; तसेच निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची गेले दोन दिवस (ता. ६ व ७ जानेवारी) दूरचित्र संवादाच्या माध्यमातून (व्हीसी) बैठक घेण्यात आली. त्यावेळी ते बोलत होते. आयोगाचे सचिव सुरेश काकाणी, पोलिस महानिरीक्षक मनोजकुमार शर्मा यांच्यासह आयोगातील विविध अधिकारी यावेळी उपस्थित होते.

श्री. वाघमारे यांनी सांगितले की, मतदान आणि मतमोजणीची प्रक्रिया सुरळितपणे पार पाडण्यासाठी सर्वांचे प्रशिक्षण होणे आवश्यक आहे. मतदान केंद्रांवर विविध व्यवस्था करण्याबाबतही सर्व अधिकारी- कर्मचाऱ्यांना अवगत करावे. मतदानासाठी येणाऱ्या मतदारांची गैरसोय होणार नाही, याची पुरेपूर दक्षता घ्यावी. मतदान केंद्रावर विजेच्या उपलब्धतेबरोबरच पिण्याचे पाणी, सावली, शौचालयाची इत्यादींची व्यवस्था असणे आवश्यक आहे. शक्य असेल तिथे आदर्श मतदान केंद्रे उभारण्यात यावित. मतदान केंद्रांवर ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग, तान्ह्याबाळासह असणाऱ्या स्त्रिया, गरोदर स्त्रिया आदींना मतदानासाठी प्राधान्य द्यावे. दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकांसाठी रॅम्प आणि व्हिलचेअरसारख्या व्यवस्थाही असाव्यात.

श्री.काकाणी यांनी सांगितले की, महानगरपालिका निवडणुकांच्या प्रचाराची मुदत १३ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ५.३० वाजता संपणार असल्याने, त्यानंतर इलेक्ट्रॉनिक आणि मुद्रित माध्यमांसह अन्य कुठल्याही प्रसारमाध्यमांद्वरे निवडणूकविषयक जाहिराती प्रसिद्ध किंवा प्रसारित करता येणार नाहीत. त्यामुळे जाहीर प्रचाराच्या समाप्तीनंतर मुद्रित माध्यमांच्या (पान २ वर)

# आता लायसन्ससाठी जादा पैसे मोजावे लागणार

## ● परिवहन विभागाकडून घरपोच सेवा दरात वाढ; १ जानेवारीपासून अंमलबजावणी

वृत्तसंस्था । पुणे

**परिवहन विभागाकडून टपाल (पोस्ट) विभागामार्फत परवाना (लायसन्स) आणि वाहन नोंदणी प्रमाणपत्र (आरसी बुक) घरपोच मिळण्यासाठी आता सेवा शुल्कात वाढ करण्यात आली आहे. त्यानुसार परवाना किंवा वाहन नोंदणी प्रमाणपत्र घरपोच देण्यासाठी ५८ रुपयांऐवजी ७० रुपये द्यावे लागणार आहेत. एक जानेवारीपासून या निर्णयाची अंमलबजावणी सुरू झाली असल्याने नागरिकांच्या खिशाला आता झळ बसणार आहे.**

राज्याच्या परिवहन विभागामार्फत वाहन चालकाने चाचणी दिल्यानंतर तसेच नवीन वाहन घेतल्यानंतर परवाना आणि वाहन नोंदणी प्रमाणपत्र संबंधित व्यक्तींना घरपोच पाठविण्यात येते. त्यासाठी परिवहन विभागाने टपाल विभागाबरोबर सामंजस्य करार केला आहे. दरवर्षी या कराराचे नूतनीकरण करण्यात येते. त्यानुसार टपाल विभागाकडून या सेवेसाठी १८ टक्के वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) आकारला जातो. त्यामुळे परिवहन विभागाकडून या सेवेसाठी नागरिकांकडून प्रत्येकी ५८ रुपये आकारले जात होते. टपाल विभागाने स्थानिक (जिल्ह्यातील) आणि गैरस्थानिक (जिल्ह्याबाहेरील) (पान २ वर)

# काँग्रेसने युतीबाबत खोट्या बातम्या पेरल्या

वृत्तसंस्था । पुणे

येथील महानगरपालिका निवडणुकीसाठी काँग्रेसने वंचित बहुजन आघाडीबरोबर युती झाली आहे, अशा समाजमाध्यमात अखेरपर्यंत खोट्या बातम्या पसरवून आमचा घात केल्याचा आरोप वंचित बहुजन आघाडीचे शहराध्यक्ष अरविंद तायडे यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत केला. दरम्यान, ज्याठिकाणी काँग्रेस आणि शिवसेना (पान २ वर)

# जळगावात भाजपकडून बंडखोरांना सक्त ताकीद

प्रतिनिधी । जळगाव

महापालिका निवडणुकीच्या रणधुमाळीत भाजपमध्ये अंतर्गत शिस्तभंगाचे गंभीर चित्र समोर आले आहे. पक्षाने समजूत घालूनही उमेदवारी मागे न घेता काही जण बंडखोरी करून अपक्ष म्हणून निवडणूक लढवत असून, आपणच भाजपचे अधिकृत उमेदवार असल्याचे भासवून मतदारांची दिशाभूल केली जात असल्याचे प्रकार उघडकीस आले आहेत. याची गंभीर दखल घेत भाजप नेतृत्वाने संबंधित बंडखोर उमेदवारांना (पान २ वर)

# नाशिक जिल्ह्यात दोन मोटारींची धडक चार प्रवासी ठार, आठ जण जखमी

वृत्तसंस्था । नाशिक

**दिंडोरी तालुक्यात नाशिक-पेठ रस्त्यावरील चाचडगाव टोल नाक्याजवळ बुधवारी दोन मोटारींची समोरासमोर धडक झाली. या अपघातात चार जणांचा जागीच मृत्यू झाला. तर आठ जण जखमी झाले. मृतांपैकी तीन जण गुजरातचे रहिवासी आहेत.**



दिंडोरी पुढे नाशिक- पेठ रस्त्यावर बुधवारी दुपारी तीनच्या सुमारास हा अपघात झाला. चाचडगाव टोल नाक्याजवळ नाशिककडून पेठकडे जाणारी मोटार आणि पेठकडून नाशिककडे येणारी मोटार यांची समोरासमोर धडक झाली. अपघातात एका मोटारीतील एक प्रवासी तसेच दुसऱ्या मोटारीतील चालक आणि दोन प्रवासी अशा चार जणांचा जागेवर मृत्यू झाला.

किसनलाल गुर्जर (४५), पूनम गुर्जर (४०), छोगालाल गुर्जर ( ६४) आणि शाहरुख खान खराकत खान अशी त्यांची नावे आहेत. एकूण आठ प्रवासी जखमी झाले. जखमींना नाशिक येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. जखमींमध्ये (पान २ वर)

# मतदान करणाऱ्या मतदाराला कपड्यांच्या किमतीत सूट

## ● मालेगावात मतदानाचा टक्का वाढवण्यासाठी कापड व्यापारी असोसिएशनचा निर्णय

वृत्तसंस्था । मालेगाव

**येथील महापालिका निवडणुकीत मतदानाचा टक्का वाढावा यासाठी प्रशासकीय पातळीवरून विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. मतदानाची टक्केवारी वाढावी म्हणून शहरातील कापड व्यापारी देखील आता पुढे सरसावले आहेत. मतदानाचा हक्क बजावून येणाऱ्या ग्राहकांना मालेगावातील दुकानदार खरेदीवर विशेष सवलत देतील, असा निर्णय कापड व्यापारी असोसिएशनतर्फे जाहीर करण्यात आला आहे.**



मतदारांमध्ये जनजागृती व्हावी व जास्तीत जास्त मतदान व्हावे यासाठी महापालिकेतर्फे विविध उपक्रम राबवले जात आहेत. तसेच जागोजागी प्रबोधन करण्यात येत आहे. महापालिका कार्यक्षेत्रातील सर्व शाळा,महाविद्यालये तसेच १८ वर्षावरील नागरिकांसाठी निबंध लेखन, चित्रकला, घोषवाक्य व कविता स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. मंगळवारी शहरात विद्यार्थ्यांची मानवी साखळी काढण्यात आली. या साखळीत शहरातील २०० शाळांमधील चार हजारावर विद्यार्थी सहभागी झाले होते. या मानवी साखळीत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी दिलेल्या घोषणांमुळे शहर दणाणून सोडले होते.

**लोकशाहीच्या उत्सवात सहभाग नोंदवणार**

मुख्य निवडणूक अधिकारी तथा आयुक्त रवींद्र जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली बुधवारी महापालिका मुख्यालयात कापड व्यापारी संघटनेची बैठक पार पडली. यावेळी महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त रोहिदास दोरकुळकर आणि उपायुक्त पल्लवी शिरसाठ यांनी व्यापाऱ्यांना मतदानाचे महत्त्व पटवून दिले. केवळ स्वतः मतदान करून (पान २ वर)

**■ दुकानांमध्ये झळकणार पोस्टर्स**

मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी महानगरपालिकेतर्फे सर्व व्यापाऱ्यांना विशेष पोस्टर्स दिले जाणार आहेत. हे पोस्टर्स दुकानाच्या दर्शनी भागात लावून ग्राहकांना मतदानासाठी प्रोत्साहित केले जाणार आहे. या बैठकीस राजेश दत्तानी, ललीत शर्मा, संतोष पाटील, पीयुष शर्मा, किशोर सोनवणे, प्रसन्न सुराणा, गौरव कासार, महेश गोपलानी, आयुष अग्रवाल, सतीश पिंगळे, जनसंपर्क अधिकारी पंकज सोनवणे, उद्यान अधीक्षक नीलेश पाटील आदी उपस्थित होते.

# ‘भगवा’ शब्दाचा उल्लेख; भाजपाच्या गीताला निवडणूक आयोगाची मनाई

वृत्तसंस्था । मुंबई

**येथील महापालिकेची निवडणूक चुरशीची होत असताना, प्रचाराच्या अंतिम टप्प्यात भारतीय जनता पक्षाला निवडणूक आयोगाकडून मोठा धक्का बसला आहे. भाजपने प्रचारासाठी तयार केलेल्या विशेष गीताला आयोगाने परवानगी नाकारली असून, त्यामुळे पक्षाच्या प्रचार रणनीतीवर परिणाम झाला आहे.**




यंदाच्या निवडणुकीत ठाकरे बंधू तब्बल २० वर्षांनंतर एकत्र आले आहेत, तर भाजप आणि शिवसेना (शिंदे गट) एकत्रितपणे निवडणूक लढवत आहेत. दुसरीकडे, काँग्रेस आणि प्रकाश आंबेडकर यांच्या नेतृत्वाखालील पक्षाची २५ वर्षांनंतर आघाडी झाली आहे. प्रचारासाठी अवघे सात दिवस शिल्लक असताना आयोगाचा हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे.

भाजपने मुंबई महापालिका निवडणुकीच्या प्रचारासाठी एक खास गीत तयार केले होते. या गीतामध्ये भगवा या शब्दाचा उल्लेख असल्याने निवडणूक आयोगाने (पान २ वर)

## संपादकीय

### शेतीबाबतची अनास्था

शेतकरी कायमच अस्मानी आणि सुलतानी (म्हणजे सरकारी) संकटाच्या कचाट्यात असतो. त्यामुळे कर्जबाजारीपणा, गरिबी, ससेहोलपट त्याच्या वाट्याला येते, हे पाहता तरुण पिढी शेती करायला धजावत नाही. महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात कोरडवाहू शेती आहे. ओलीताच्या शेतीचे प्रमाण फारच कमी. विदर्भ त्याबाबतीत वरच आहे. अशावेळी शेती ही पावसाच्या पाण्यावर अवलंबून असते. पर्यावरणाचा समतोल बिघडल्यामुळे पाऊस हा लहरी झाला आहे. कधी अतिवृष्टी तर कधी कोरडा दुष्काळ हा शेतकर्यांच्या पाचवीलाच पूजला आहे. त्यामुळे दरवर्षी ठराविक उत्पन्न येईलच याची शाश्वती नाही. अशावेळी कर्ज घेऊन बियाणे वाया गेल्यास नुकसान होते. तसेच कीटकनाशक, रासायनिक खते, सेंद्रिय खते यांच्या किमती गगनाला भिडल्या आहेत. त्यासाठीही कर्ज घ्यावे लागते. शिवाय शेतमजुरी वाढली आहे. या सगळ्यांचा परिणाम म्हणजे उत्पादन खर्च वाढीवर होतो. त्यानुसार शेतमालाला भाव मिळत नाही. परिणामी नफ्याचे प्रमाण अत्यल्प असते. शिवाय मध्ये दलाल (अडते) हा एक खोळंबा आहेच. नाशवंत माल, डोक्यावर कर्जाचा भार, दैनंदिन जीवनातील समस्या यामुळे शेतकरी आपला शेतमाल साठवून ठेवू शकत नाही. पडेल त्या भावाला विकून टाकतो. या सगळ्याचा परिणाम म्हणजे कर्जबाजारीपणा आणि गरिबी. असे शेतीविषयक चित्र असल्यामुळे नवीन पिढी शेती व्यवसायाकडे धजत नाही. त्यांची धाव शहराकडे असते. जेणेकरून आपले जीवनमान आधीच्यापेक्षा उंचावेल अशी त्याला आशा वाटते. तरुण पिढी शेतीकडे न वळण्याचे एक कारण म्हणजे लग्नाकरता मुली न मिळणे. आज कुठल्याच मुलीला शेतकरी नवरा नको असतो. त्यामुळे आई-वडीलसुद्धा मुलाला शेती करण्यापेक्षा नोकरी कर असाच सल्ला देतात. कारण मुली शेतकरी नवरा न करण्यामागचं कारण म्हणजे आर्थिक अस्थिरता, कर्जबाजारीपणा. ही स्थिती शेतकर्यावर येण्याची अनेक कारणे आहे. वर्षानुवर्ष, पिढ्यान्पिढ्या त्याच पद्धतीने शेती करणे, तीच पारंपरिक पिके घेणे जसे कापूस, तूर, मूग, गहू मात्र लहरी पावसामुळे एकदा पीक बुडाले की मग हाती काहीच लागत नाही. जर पीक भरपूर आले तर भाव मिळत नाही. कारण ही पिके भारतात सगळीकडेच विपुल येतात. त्यामुळे भाव पाडले जातात. ज्या पिकांना मागणी आहे अशी पिके घेतल्यास भाव चांगला मिळतो. मागणी तसा पुरवठा या न्यायाने पिके घ्यावी लागतात. परंतु शेतकर्यांची कोणताही धोका पत्करायची तयारी नसते. त्यामुळे त्याच त्या चक्रात आजचा शेतकरी अडकला आहे. शेतीविषयी सरकारची उदासीनता हासुद्धा एक मोठा घटक यामागे आहे. सरकारी योग्य विपणन व्यवस्था, माल साठवणुकीच्या सोयी, उत्पादनावर आधारित भाव, कमी व्याजदर आणि कर्ज, स्वस्त बियाणे, स्वस्त खते अशा सुविधा पुरविल्यास शेती पुन्हा फायद्यात येऊ शकते. पण सरकारी उदासीनतेमुळे शेतीची दुरवस्था होते आहे. त्याचाच परिणाम नवीन पिढी शेती करण्यास धजावत नाही. याशिवाय पारंपरिक शेतीच करत राहिल्याने व त्यात विविधता न आणल्याने शेती तोट्यात येऊ लागली. त्यामुळेसुद्धा तरुणांनी याकडे पाठ फिरवली. पारंपरिक शेती करणार्या शेतकर्यांच्या नवीन पिढीने जरी शेतीकडे पाठ फिरवली असली तरी गेल्या पंधरा-वीस वर्षांत अनेक शिक्षित, उच्चशिक्षित, ॲग्रीकल्चर पदवीधर या नवीन तरुणांनी शेतीला व्यवसाय समजून त्यात प्रदार्पण केले आहे. अनेक तरुण नवीन कल्पना, नवीन तंत्रज्ञान वापरून शेती एक उद्योग म्हणून करत आहे आणि त्यात यशस्वीसुद्धा झाले आहेत. फुलांची मागणी बाराही महिने असते त्यासाठी फुल झाडांची लागवड करून भरपूर उत्पन्न घेऊ शकतो. त्याचप्रमाणे फळझाडांची लागवड करूनही मोठ्या प्रमाणात उत्पन्न घेऊ शकतो.

# ग्रामपंचायतींकडून ९ कोटी १७ लाखांची वसुली

## ● सीईओ मिनल करनवाल यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामपंचायतींची प्रभावी कामगिरी....

प्रतिनिधी । जळगाव



**जिल्ह्यातील ग्रामपंचायतींमार्फत ग्रामस्थांकडील घरपट्टी व पाणीपट्टीची थकीत रक्कम वसूल करण्यासाठी जिल्हा परिषद जळगावच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष कर वसुली मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेला ग्रामस्थांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून, या माध्यमातून ९ कोटी १७ लाख ४६ हजार रुपयांची कर वसुली करण्यात आली आहे.**

या विशेष मोहिमेअंतर्गत चालू आर्थिक वर्षाचा १०० टक्के कर भरणा करणाऱ्या ग्रामस्थांना मागील थकबाकीवर ५० टक्के सूट देण्यात आली होती. या सवलतीचा मोठ्या प्रमाणावर लाभ घेत ग्रामस्थांनी थकित कर भरणा करून ग्रामपंचायतींच्या आर्थिक सक्षमतेस हातभार लावला आहे. ग्रामपंचायत विभागामार्फत यापूर्वी देखील थकीत कर वसुलीसाठी लोकअदालतीच्या माध्यमातून तडजोडीचा पर्याय उपलब्ध करून देण्यात आला होता. लोकअदालतीच्या माध्यमातूनही मोठ्या प्रमाणावर कर वसुली साध्य झाली होती. त्याचप्रमाणे ३१ डिसेंबर २०२५ अखेर कर भरणा करणाऱ्या ग्रामस्थांना ५० टक्के सूट देण्याचा निर्णयही प्रभावी ठरला आहे. या मोहिमेच्या यशस्वितेसाठी ग्रामपंचायत विभागाचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी बी एस अकलाडे यांच्या सह ग्रामविस्तार अधिकारी,ग्रामपंचायत अधिकारी यांचे सह स्थानिक पातळीवरील अधिकारी व कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.



**■ पारदर्शक, लोकाभिमुख प्रशासन राबवणार...**

या मोहिमेमुळे ग्रामपंचायतींचे उत्पन्न वाढण्यास मदत झाली असून, विकासकामांसाठी आर्थिक बळकटी मिळाली आहे. पुढील काळातही कर वसुलीबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करून पारदर्शक व लोकाभिमुख प्रशासन राबविले जाईल, असे जिल्हा परिषद प्रशासनाच्यावतीने सांगण्यात आले आहे.

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात गतिमंद रुग्णावर यशस्वी औषधोपचार

प्रतिनिधी । जळगाव

**येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात एका बेवारस गतिमंद रुग्णावर यशस्वी औषधोपचार करून त्याला पूर्ण बरे करून ठाणे येथील पुनर्वसन केंद्रात पाठविण्यात आले आहे. गेली ३ महिने रुग्णालयातील डॉक्टर्स, कर्मचारी वर्ग मायेने काळजी घेत होता. याबाबत अधिष्ठाता डॉ. गिरीश ठाकूर यांनी पथकाचे कौतुक केले.**

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात दि.१५ सप्टेंबर २०२५ रोजी पोलिसांनी १०८ रुग्णवाहिकेतून एका १५ वर्षीय मुलाला मतिमंद असल्याने व त्याला फिटचा आजार असल्याने उपचारासाठी मनोविकार विभागात उपचारासाठी दाखल केले होते. यावेळी तत्कालीन विभागप्रमुख डॉ. यश महाजन यांनी तपासून त्याला रुग्णालयात दाखल केले. कक्ष क्रमांक १३ येथे गेली साडेतीन महिने मनोविकार विभाग औषधोपचार करून त्याच्या प्रकृतीवर लक्ष ठेवत होता. त्याचे नातेवाईक मिळून येत नसल्याने या बालकाला मोफत जेवण, मोफत कपडे आणि इतर शुश्रूषा कक्षातील परिचारिका वर्ग, कक्षसेवक तसेच सामाजिक कार्यकर्ते इसाक बागवान हेच करीत होते.

दरम्यान, पूर्ण साडेतीन महिने संपूर्ण उपचार झाल्यावर त्याला विभागप्रमुख डॉ.विकास गायसमुद्रे यांनी तपासून ठाणे येथील प्रादेशिक मनोरुग्णालयात पुनर्वसनासाठी पोलिसांच्या मदतीने रवाना केले. या रुग्णावर उपचार करण्याकामी डॉ.शताक्षी वाघजाळे, डॉ.राहुल पाटील, परिचारिका ज्योती ओतारी, पोकॉ.प्रशांत सैंदाणे, अमित मराठे, सामाजिक कार्यकर्ते इसाक बागवान आदींनी परिश्रम घेतले.

# रायसोनी करंडक स्पर्धेत केसीई अभियांत्रिकी महाविद्यालय तृतीय

## ● नागपूर येथे होणाऱ्या अंतिम फेरीत दाखल



प्रतिनिधी । जळगाव

**खान्देश कॉलेज एजुकेशन सोसायटीचे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट महाविद्यालयाने रायसोनी करंडक स्पर्धेच्या प्रथम तालीम फेरीत तृतीय क्रमांक पटकावला. यामुळे संघाची १ ते ४ फेब्रुवारीदरम्यान, नागपूर येथे होणाऱ्या अंतिम फेरीसाठी निवड झाली आहे.**

महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी एकांकिका सादरीकरणात उत्कृष्ट अभिनय व सादरीकरण करत परीक्षकांची दाद मिळवली. या एकांकिकेचे दिग्दर्शन प्रा. यश चौधरी यांनी केले.

स्पर्धेचे समन्वयक म्हणून प्रा.यश चौधरी व प्रा. रेवती पाटील यांनी काम पाहिले. संघाच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष नंदकुमार बेंडाळे, प्राचार्य डॉ.संजय सुगंधी यांनी अभिनंदन केले तर अकॅडमिक डीन प्रा.राहुलकुमार पटेल, ॲडमिनिस्ट्रेटिव्ह डीन प्रा.गणेश पाटील, आयक्यूएसी समन्वयक प्रा.कल्पेश महाजन डिप्लोमा समन्वयक प्रा.बी.जे. लाठी आदींनी पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# रेडक्रॉसच्या समुपदेशन केंद्राचे उद्घाटन

प्रतिनिधी । जळगाव

इंडियन रेडक्रॉस सोसायटीतर्फे सुरु करण्यात आलेल्या रेडक्रॉस मानसशास्त्रीय समुपदेशन केंद्राचे व रेडक्रॉस समुपदेशन मार्गदर्शन पेटीचे उद्घाटन बुधवार, दि.७ रोजी रेडक्रॉस भवन येथे करण्यात आले.

याप्रसंगी रेडक्रॉस चेअरमन डॉ.मंगला ठोंबरे, व्हाईस चेअरमन व समुपदेशन समिती अध्यक्ष धनंजय जकातदार, रक्तकेंद्र चेअरमन डॉ. प्रसन्नकुमार रेदासनी, कार्यकारिणी सदस्य नीळकंठ गायकवाड, समुपदेशक व सभासद रागिब अहमद, ॲन्युअल असोसिएट्स डॉ. दत्तात्राव राठोड, प्रशासकीय अधिकारी लक्ष्मण तिवारी, सिनियर लेखापाल महेश सोनगिरे उपस्थित होते. समुपदेशन पूर्व नाव नोंदणी करण्यासाठी ७३७८३४३८३४ किंवा ९४२२४३६५६६ क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

# रायसोनी महाविद्यालयाच्या बीसीए, एमसीएच्या विद्यार्थ्यांचा विमानतळावर अभ्यासदौरा

प्रतिनिधी । जळगाव



**येथील जी. एच. रायसोनी कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग अँड मॅनेजमेंट महाविद्यालयाच्या डिपार्टमेंट ऑफ कॉम्प्युटर ॲप्लिकेशनतर्फे जळगाव विमानतळावर औद्योगिक अभ्यासदौरा आयोजित करण्यात आला होता. या अभ्यासदौऱ्यात बीसीए व एमसीए विभागातील विद्यार्थ्यांनी सहभागी होत विमानतळावरील सुरक्षा व्यवस्था, आयटी प्रणाली व तांत्रिक प्रक्रियांची माहिती जाणून घेतली.**

विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानासोबतच प्रत्यक्ष कार्यपद्धतीचा अनुभव देणे हा या औद्योगिक भेटीचा मुख्य उद्देश होता. अभ्यास दौऱ्यादरम्यान विद्यार्थ्यांनी विमानतळावरील अत्याधुनिक सुरक्षा व्यवस्था, माहिती तंत्रज्ञानाचा वापर, विविध सॉफ्टवेअर प्रणाली, तसेच विमान वाहतुकीशी संबंधित तांत्रिक व प्रशासकीय प्रक्रिया यांचे सखोल अध्ययन केले. प्रत्यक्ष कार्यक्षेत्र पाहिल्यामुळे विद्यार्थ्यांना सैद्धांतिक संकल्पना अधिक स्पष्टपणे समजल्या व व्यावहारिक ज्ञानात भर पडली. या उपक्रमाबद्दल जी.एच. रायसोनी इन्स्टिट्यूटच्या संचालिका प्रा.डॉ. प्रीती अग्रवाल यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. अशा औद्योगिक अभ्यासदौऱ्यांमुळे विद्यार्थ्यांना शैक्षणिक अभ्यासक्रमात शिकविलेल्या सैद्धांतिक संकल्पनांचा प्रत्यक्ष उपयोग कसा होतो, हे समजण्यास मदत होते. तसेच उद्योगजगतातील कार्यपद्धती, तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष वापर व व्यावसायिक शिस्त यांची ओळख विद्यार्थ्यांना मिळते, ज्यामुळे त्यांचा व्यावसायिक दृष्टिकोन अधिक व्यापक व परिपक्व होतो. भविष्यातील करिअर घडणीच्या दृष्टीने असे उपक्रम अत्यंत महत्त्वाचे असून विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढविण्यासही ते उपयुक्त ठरतात, असे त्यांनी नमूद केले.

हा अभ्यासदौरा बीसीए व एमसीए विभागप्रमुख प्रा. कल्याणी नेवे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला. प्रा. शुभम अडवाल व प्रा. तेजस्विनी वारके यांनी या अभ्यासदौऱ्याचे प्रभावी नियोजन करत विधार्थ्यांच्या शंकांचे समाधान केले.

## पान १ वरुन

**मतदान करणाऱ्या मतदाराला......**

चालणार नाही, तर आपल्या दुकानातील कर्मचारी आणि ग्राहकांनाही या राष्ट्रीय कर्तव्याची जाणीव करून द्यावी, असे आवाहन दोरकुळकर यांनी बैठकीत केले. या आवाहनास उपस्थित व्यापाऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

येत्या १५ जानेवारी २०२६ रोजी होणाऱ्या मतदानानंतर जे ग्राहक शाई लावलेले बोट दाखवून दुकानात येतील, त्यांना कापड खरेदीवर खास सवलत दिली जाईल, अशी हमी कापड व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष संजय सोनजे यांनी बैठकीत दिली. त्याला उपस्थित सर्व दुकानदारांनी अनुमोदन दिले. लोकशाही मूल्ये जपणे आणि १०० टक्के मतदानाचा संकल्प पूर्ण करण्यासाठी आम्ही हा निर्णय घेत असून मालेगावची कापड बाजारपेठ या लोकशाहीच्या उत्सवात सक्रिय सहभाग नोंदवेल, असे आश्वासन सोनजे यांनी यावेळी दिले.

**निवडणूक प्रशिक्षणास गैरहजर......**

जाहिरातीच्या पूर्वप्रमाणनाचा किंवा परवानगीचा प्रश्न उद्भवत नाही. यासंदर्भातील सविस्तर बाबी राज्य निवडणूक आयोगाच्या ९ ऑक्टोबर २०२५ रोजीच्या 'निवडणुकांच्या प्रयोजनार्थ प्रसारमाध्यम संनियंत्रण व जाहिरात प्रमाणन आदेश, २०२५ मध्ये नमूद केल्या आहेत.

**नाशिक जिल्ह्यात दोन......**

सहा महिला आणि दोन पुरुषांचा समावेश आहे. दिंडोरी पोलीस ठाण्यात अपघाताची नोंद करण्यात आली आहे.

**'भगवा' शब्दाचा उल्लेख......**

आचारसंहितेचा भंग होत असल्याचा आक्षेप नोंदवला. आयोगाच्या नियमांनुसार प्रचारादरम्यान धार्मिक भावना किंवा विशिष्ट धार्मिक रंगांचा वापर करण्यावर कडक निर्बंध आहेत. त्यामुळे या गीताच्या प्रसारणास आयोगाने मनाई केली.हे गीत प्रसिद्ध गायक अवधुत गुप्ते आणि गायिका वैशाली सामंत यांच्या आवाजात साकारण्यात आले होते. अंतिम टप्प्यात मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी या गीताचा वापर करण्याची भाजपची योजना होती. मात्र, आयोगाच्या निर्णयामुळे ही प्रचार मोहीम थांबवावी लागली असून, निवडणूक प्रचारातील नियमांची काटेकोर अंमलबजावणी पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे.

**आता लायसन्ससाठी जादा......**

असे दोन दर आकारणीबाबत परिवहन विभागाकडे प्रस्ताव पाठविला होता.या प्रस्तावाला परिवहन विभागाने मान्यता दिली आहे. त्याची अंमलबजावणी एक जानेवारीपासून सुरू करण्यात आली आहे. याबाबत परिवहन विभागाने परिपत्रक काढले आहे. त्यामुळे आता नागरिकांना परवाना आणि वाहन नोंदणी प्रमाणपत्रासाठी प्रत्येकी ५८ रुपयांऐवजी ७० रुपये मोजावे लागणार आहेत.

टपाल विभागाकडून स्थानिक पत्त्यावर जिल्ह्यांतर्गत सेवा देण्यासाठी ४४.६५ रुपये सेवाशुल्क आकारले जात होते. तसेच जिल्ह्याबाहेर (गैरस्थानिक) पत्त्यासाठी ८०.९९ रुपये असे दोन दर सूचवले होते. मात्र, 'वाहन' आणि 'सारथी' या ऑनलाईन प्रणालीमध्ये दोन वेगळे दर आकारणे तांत्रिकदृष्ट्या शक्य नसल्याने परिवहन विभागाने परवाना किंवा वाहन नोंदणी प्रमाणपत्र घरपोच देण्यासाठी प्रत्येकी ७० रुपये दर आकारण्याचा निर्णय घेतला आहे

परिवहन विभागाच्या घरपोच सेवेसाठी दरवाढ केल्यामुळे पक्क्या परवान्यासाठी ७७० रुपये (जुने दरानुसार ७५८), नुतनीकरण केलेल्या परवान्यासाठी ४७०(जुन्या दरानुसार ४५८) रुपये आणि दुचाकी चारचाकी एकत्र परवान्यासाठी १,०७० रुपये मोजावे लागणार असून एक ऑक्टोबर २०२५ पासून ज्या नागरिकांनी वाहने घेतली आहेत, पक्के परवाने किंवा नुतनीकरण केले आहे, त्यानुसार एक जानेवारीपासून वाढीव शुल्कानुसार आकारणी करावी असे निर्देश दिले आहेत.

**जळगावात भाजपकडून......**

सक्त ताकीद दिली आहे.भाजपच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, संबंधित उमेदवारांनी येत्या दोन दिवसांत आपली भूमिका स्पष्ट न केल्यास आणि पक्षादेशाचे उल्लंघन सुरूच ठेवल्यास त्यांच्यावर शिस्तभंगाची कठोर कारवाई करण्यात येणार आहे.

**काँग्रेसने युतीबाबत......**

(उद्धव ठाकरे) यांनी एकत्रित उमेदवार उभे केले आहेत, अशाच ठिकाणांवर वंचित बहुजन आघाडीचे ५८ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उभे करण्यात आले आहे, असेही त्यांनी नमूद केले.

# तीन मिनिटांत सोडवली १०० गणिते

प्रतिनिधी । जळगाव

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात रविवारी (दि.४) पार पडलेल्या उत्तर महाराष्ट्र प्रादेशिक एसआयपी अबॅकस स्पर्धेत तनुष्का विठ्ठल हटकर या विद्यार्थिनीने लेव्हल-४ मध्ये ३ मिनिटांत १००हून अधिक गणिते अचूक सोडवून उपस्थितांना आश्चर्य चकित केले. या स्पर्धेत खान्देशभरातून १ हजाराहून अधिक विद्यार्थी सहभागी झाले होते. कार्यक्रमास दिनेश व्हिक्टर आणि राजेंद्र नन्नवरे उपस्थित होते.

# पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी प्रमोद पाटील, भिका चौधरी

प्रतिनिधी । जळगाव



**जिल्हा पत्रकार संघाची सर्वसाधारण सभा मंगळवार, दि.८ रोजी पार पडली. सभेत पत्रकार संघाच्या पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. यात जिल्हाध्यक्षपदी प्रमोद पाटील तर ग्रामीणच्या जिल्हाध्यक्षपदी भिका चौधरी यांची निवड करण्यात आली. पत्रकार संघाचे विश्वस्त विजय पाटील यांनी पदाधिकाऱ्यांच्या नावांची घोषणा केली.**

उर्वरित कार्यकारिणीत कार्याध्यक्ष पांडुरंग महाले, सरचिटणीस दिलीप शिरुडे, भवन समिती अध्यक्ष दीपक नगरे (रावेर), सचिव सारंग भाटिया, जिल्हा संघटक मोतीलाल जोगी, खजिनदार फारुख शेख, उपाध्यक्ष प्रा.राजेंद्र देशमुख, देविदास वाणी, सचिन सोमवंशी, भरत चौधरी (धरणगाव), राजेश यावलकर, सुरेश पाटील (यावल), चरणसिंग पाटील. सहचिटणीस डॉ.नलीन महाजन, अरुण मोरे, छायाचित्रकार अध्यक्ष गोकुळ सोनार, एरंडोल तालुकाध्यक्ष बी.एस. चौधरी, जामनेर तालुकाध्यक्ष तेजमल जैन आदींचा समावेश आहे. पत्रकार संघ व भवन समितीची उर्वरित कार्यकारिणीनंतर जाहीर करण्यात येणार असल्याची माहिती पदाधिकाऱ्यांतर्फे देण्यात आली.

**■ रक्तदान, आरोग्य शिबिराचा घेतला लाभ**

जिल्हा पत्रकार संघ व मुक्ती फाउंडेशनतर्फे इंडियन रेडक्रॉस सोसायटी आणि आर. एल. हॉस्पिटलच्या सहकार्याने रक्तदान व आरोग्य शिबीर घेण्यात आले. शिबिराचा ९६ जणांनी लाभ घेतला. या उपक्रमासाठी पत्रकार संघाचे विजय पाटील, अशोक भाटिया, दिलीप शिरुडे, डॉ.नितीन धांडे, मुक्ती फाउंडेशनचे मुकुंद गोसावी, स्वप्निल पालवे, गोपाल वालेचा आदींचे सहकार्य लाभले.

# कला व शिक्षण मानवाचा अविभाज्य भाग

## ● शास्त्रीय नृत्याच्या ज्येष्ठ अभ्यासिका डॉ.सुचेता भिडे-चापेकर यांचे मत

प्रतिनिधी । जळगाव

**कला व शिक्षण मानवाचा अविभाज्य भाग असून कलेला पुरातन काळापासूनचा इतिहास आहे. शास्त्रीय नृत्यातून चांगले करिअर घडू शकते असे प्रतिपादन, शास्त्रीय नृत्याच्या ज्येष्ठ अभ्यासिका डॉ.सुचेता भिडे-चापेकर यांनी केले.**



**■ भरतनाट्यम, ओडीसीसह विविध नृत्यांवर मार्गदर्शन**

नृत्यशास्त्र अभ्यासिका डॉ.स्वाती दैठणकर यांनी भरतनाट्यम या विषयावर मार्गदर्शन केले. तिसऱ्या सत्रात डॉ.प्रितीलेखा चौधरी यांनी ओडीसी नृत्य प्रकाराबाबत मार्गदर्शन केले. प्रा.डॉ.जयंत शेवतेकर यांच्या अध्यक्षतेखाली संशोधक विद्यार्थ्यांनी शोधनिबंधाचे सादरीकरण केले. चौथ्या सत्रात मुरलीमोहन कालवाकालवा यांनी विविध नृत्यांबाबत तर पाचव्या सत्रात डॉ.जयंत शेवतेकर यांनी मार्गदर्शन केले. विद्यापीठाचे प्र-कुलगुरू प्रा.एस.टी.इंगळे यांच्या उपस्थितीत राष्ट्रीय परिषदेचा समारोप पार पडला.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात पीएमउषा अंतर्गत डिपार्टमेंट ऑफ परफॉर्मिंग आर्टस अॅन्ड फाईन आर्टस विभागातर्फे आयोजित शास्त्रीय नृत्याचा गौरवशाली वारसा या एकदिवसीय राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर कुलगुरू प्रा.डॉ. व्ही.एल. माहेश्वरी, व्यवस्थापन परिषद सदस्य राजेंद्र नन्नवरे, नितीन झाल्टे, संयोजक नेहा जोशी, कला व मानव्यविद्या प्रशाळेचे संचालक प्रा.डॉ. राम भावसार उपस्थित होते. पुढे बोलतांना डॉ.सुचेता भिडे-चापेकर यांनी, नवीन शैक्षणिक धोरणात नृत्य कलांचा समावेश करण्यात आला असून प्रचार आणि प्रसारासाठी सुजाण नागरिकांची आवश्यकता आहे. दैनंदिन जीवनात नृत्यकला प्रकार निश्चितच उपयोगी ठरणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला. प्रास्ताविक सिनेट सदस्य नेहा जोशी यांनी तर सूत्रसंचालन डॉ.प्रिती सोनी यांनी केले. आभार डॉ. सुचित्रा लोंढे यांनी मानले.

**■ कला म्हणजेच जीवनशौली : कुलगुरु**

अध्यक्षीय मनोगतात कुलगुरू प्रा.डॉ. व्ही.एल. माहेश्वरी म्हणाले की, कला म्हणजेच जीवनशौली असून शास्त्रीय नृत्याला अतिशय महत्वाचे स्थान आहे. हा कला प्रकार जीवनशौलीला प्रतिबिंबित करत असल्यामुळे कला, भक्ती, अध्यात्म अणि जीवनशौली म्हणून त्याकडे बघतात. वेगवेगळ्या कलाप्रकारांमुळे शहराची सांस्कृतिक शहर म्हणून ओळख होत आहे. विद्यापीठाने शैक्षणिक क्षेत्रात दर्जेदार ओळख निर्माण केली असल्याचेही ते म्हणाले.


हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक सागर काशिनाथ ओतारी व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी -३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव -४२५००१ येथे छापून शॉप नं. ई-१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव- ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
✼ कार्यकारी संपादक - किशोर शंकर शिंपी (मोबा. - ७५८८८१३१३२) (✼ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) E-Mail : dainikshauryamarathi@gmail.com

# वनशेतीतून स्वाभिमान, आत्मनिर्भरतेचा प्रबोधनात्मक प्रवास

## ➲ कुंभरीतील सेगा राज्या पटले यांनी कष्टांनी उभारलं आदर्श वनशेतीतील स्वप्न

प्रतिनिधी । धडगाव

**तालुक्यातील कुंभरी येथील सेगा राज्या पटले आणि त्यांच्या कुटुंबाने वनशेतीच्या माध्यमातून केवळ आपला उदरनिर्वाह सक्षम केला नाही, तर स्थलांतराच्या समस्येला देखील कायमचा विराम दिला आहे. विविध अडचणींना तोंड देत, त्यांनी २०१७ साली शासनाच्या ग्रीन आर्मी उपक्रमाअंतर्गत वनशेतीला सुरुवात केली आणि आज महिरवा सातपुडाफहे स्वप्न प्रत्यक्षात उतरवले आहे. त्यांच्या या अथक परिश्रमाच्या यशासाठी त्यांना नुकतेच ल्हाधिकारी डॉ. मिताली शेट्टी यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.**



कुंभरी येथील डोंगराळ आणि चढ-उताराच्या जमिनींमुळे पटले कुटुंबाला दरवर्षी चार महिने मजुरीसाठी स्थलांतर करावे लागायचे. परंतु, २०१७-१८ मध्ये ग्रीन आर्मी उपक्रमाअंतर्गत त्यांनी वनशेतीच्या माध्यमातून आपली जीवनधारा बदलण्याचा निर्णय घेतला.

१८ जून २०१७ रोजी सुमारे ६ हेक्टर क्षेत्रात लागवडीसाठी खड्डे खोदले गेले. २० जुलै २०१७ रोजी पीपल्स कोऑर्डिनेशन फाउंडेशन च्या माध्यमातून १२०० रोपे मोफत मिळाली, ज्यात आंबा, पेरू, महुआ, बोर, साग, आणि बांबू यांचा समावेश होता. पण पाण्याचा प्रश्न मोठा अडथळा बनला. प्रथम वर्षी १ किलोमीटर अंतरावरून पाणी वाहून रोपांना दिले गेले, पण काही रोपे पाण्याअभावी दगावली.

पण, सेगा पटले आणि त्यांच्या कुटुंबाने हार मानली नाही. त्यांनी स्वतः श्रम करून विहीर खोदली आणि पाच ते सहा फुटांवर पाणी मिळाल्यानंतर त्यांचा संघर्ष यशस्वी झाला. त्यांची पत्नी बुथरी सेगा पटले यांनी महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजना आणि उमेद स्वयं-सहायता समूहमार्फत कर्ज घेऊन पाईपलाइन तयार केली, ज्यामुळे रोपांना नियमित पाणी मिळू लागले.

**ढगफुटीचा धक्का, पण नवा आशावाद**

ी८ जून २०१९ ला झालेल्या ढगफुटीमुळे मोठा धक्का बसला. पाईपलाइन वाहून गेली, विहीर दबली आणि सुमारे १०० झाडांचे नुकसान झाले. परंतु, त्यांना सरकारकडून कोणतीही नुकसानभरपाई मिळाली नाही. तरीही, सेगा पटले आणि त्यांच्या कुटुंबाने मनरेगा आणि उमेद स्वयं-सहायता समूह अंतर्गत पुन्हा विहीर खोदली, पाईपलाइन बसवली आणि कुंपण तयार केले.

२०१९ ते २०२१ दरम्यान कृषी विभाग, सामाजिक वनीकरण, बीएआयएफ संस्था आणि राष्ट्रीय बांबू मिशनच्या माध्यमातून हजारो रोपांची लागवड केली गेली. आज त्यांच्या शेतात ९,००० पेक्षा जास्त झाडे जिवंत आहेत, मातीचे धूप थांबले आहे, आणि पर्यावरणाचे संरक्षणदेखील केले जात आहे. लवकरच, फळांचे उत्पन्न त्यांना शाश्वत आणि स्थिर उत्पन्नाचे स्रोत उपलब्ध करणार आहे.

विशेषतः सेगा पटले यांचा हा प्रवास केवळ त्यांच्यासाठीच नाही, तर संपूर्ण आदिवासी समुदायासाठी एक प्रेरणा बनला आहे. महिरवा सातपुडाफ हे स्वप्न आज प्रत्यक्षात साकार होत आहे, आणि त्यांच्या कष्टांचा परिणाम त्यांच्या आणि इतर आदिवासी कुटुंबांसाठी सकारात्मक ठरत आहे.

आमच्यासमोर अनेक अडचणी होत्या. पाणीटंचाई, निसर्ग आपत्ती आणि आर्थिक मर्यादा. सुरुवातीला मेहनत जास्त होती, पण आज स्थलांतर थांबले आहे आणि आपल्या जमिनीवरच भवितव्य उभे राहत आहे. योग्य मार्गदर्शन, शासनाची साथ आणि कुटुंबाची मेहनत असेल, तर डोंगराळ भागातही शेतीतून चांगले जीवन घडवता येते, हा माझा ठाम विश्वास आहे.

– सेगा राज्या पटले, कुंभरी.

■ **वनशेतीकडे वळावे...**

**वनशेती हा केवळ शेतीचा पर्याय नसून आदिवासी भागाच्या शाश्वत विकासाचा मजबूत मार्ग आहे. राज्या पटले कुटुंबाने प्रचंड अडचणी असूनही चिकाटी सोडली नाही. शासकीय योजना, संस्थात्मक मदत आणि स्वतःचे कष्ट यांचा योग्य मेळ घालता आला, तर स्थलांतर थांबवून स्वाभिमानी जीवन जगणे शक्य आहे, हे त्यांनी प्रत्यक्ष कृतीतून दाखवून दिले आहे. इतर आदिवासी कुटुंबांनीही या अनुभवातून प्रेरणा घेऊन वनशेतीकडे वळावे, हीच अपेक्षा.**

**– गणेश पराडके, माजी अर्थ व शिक्षण सभापती, नंदुरबार जिल्हा परिषद**




## थोडक्यात

### चिंचपाडा परिसरात विजेचा खेळखंडोबा

**साक्री ।** तालुक्यातील चिंचपाडा, बोदगाव आणि मैदाणे परिसरात गेल्या काही दिवसांपासून विजेचा लपंडाव सुरू असून, यामुळे नागरिक कमालीचे त्रस्त झाले आहेत. वारंवार खंडित होणाऱ्या पुरवठ्यामुळे शेती क्षेत्रासह विद्यार्थ्यांच्या अभ्यासाचेही मोठे नुकसान होत आहे. या गंभीर समस्येकडे लक्ष वेधण्यासाठी वीज संतप्त ग्रामस्थांनी दहिवेल येथील महावितरणचे अधिकारी व्ही. पी. राठोड यांना निवेदन दिले. यावेळी महावितरण कंपनीने याकडे गांभीर्याने लक्ष द्यावे. तसे न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देखील देण्यात आला.

### यशवंत विद्यालयात राष्ट्रीय गणित दिन उत्साहात

**नंदुरबार ।** तालुका विधायक समिती संचलित यशवंत विद्यालयात राष्ट्रीय गणित दिन उत्साहात साजरा करण्यात आला. गणिततज्ञ श्रीनिवास रामानुजन यांच्या जयंतीनिमित्त आयोजित या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य पुष्पेन्द्र रघुवंशी होते. प्रमुख अतिथी म्हणून विद्यालयाचे पर्यवेक्षक विलास पाटील तर सांस्कृतिक विभागाच्या प्रमुख सोनिया पाडवी उपस्थित होत्या. कार्यक्रमाची सुरुवात श्रीनिवास रामानुजन यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यानंतर विनम्र अभिवादनाचा कार्यक्रम पार पडला.

# धुळे महापालिकेच्या निवडणुकीसाठी मध्यप्रदेश निवडणूक आयोगाने दिली मतदान यंत्र

प्रतिनिधी । धुळे

**धुळे महापालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदान प्रक्रिया सुरळीत, सुरक्षित व पारदर्शकपणे पार पडावी यासाठी आवश्यक निवडणूक साहित्य उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने जिल्हा प्रशासनाने कार्यवाही सुरू केली आहे. मध्यप्रदेश राज्य निवडणूक आयोगाकडून प्राप्त मतदान यंत्रांपैकी १ हजार कंट्रोल युनिट, २ हजार बॅलेट युनिट तसेच २७१३ मार्कर पेन महापालिकेला देण्याचे आदेश जिल्हा प्रशासनाने दिले आहेत.**



जिल्ह्यातील शिरपूर, शिंदखेडा, साक्री व धुळे तालुक्यांना यापूर्वी विविध स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी वितरित करण्यात आलेल्या मतदान यंत्रांमधूनचहीयंत्रे महापालिकेला उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. त्यानुसार शिंदखेडा, साक्री व धुळे तालुक्यांकडून आवश्यक त्या प्रमाणात कंट्रोल युनिट, बॅलेट युनिट तसेच मार्कर पेन महापालिकेकडे हस्तांतरित करण्यात येणार आहेत. मतदान यंत्रे व निवडणूक साहित्य हस्तांतरित करताना प्रत्येक यंत्राच्या क्रमांकानुसार एक्सेल शीटमध्ये नोंद ठेवणे बंधनकारक करण्यात आले आहे. तसेच संबंधित नोडल अधिकाऱ्याची पोहोच घेणे आवश्यक असून, या प्रक्रियेद्वारे साहित्याच्या हालचालींची संपूर्ण नोंद ठेवली जाणार आहे. महापालिकेची निवडणूक प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर ज्या पेटीतून मतदान यंत्रे देण्यात आली आहेत, त्याच क्रमांकाच्या पेटीतून ती पुन्हा संबंधित तहसीलदारांकडे परत देण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत.

# सेल्फी पॉईंट्स ठरले तरुणांमध्ये आकर्षण

प्रतिनिधी । धुळे

**धुळे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक ही जवळच येऊन पोहोचलेली आहे. मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी धुळे महानगर पालिकेचे आयुक्त नितीन कापडणीस यांच्या कल्पक संकल्पनेतून महानगरपालिका क्षेत्रातील नेहमी वर्दळ असणाऱ्या शाळांच्या दर्शनी भागामध्ये सेल्फी पॉईंट लावण्याचा निर्णय घेण्यात आला.**

सामाजिक माध्यमांमधून अत्यंत उत्कृष्ट प्रतिसाद मिळताना दिसून येत आहे. अनेक तरुण तरुणी व नव मतदार आपल्या



व्हाट्सअप व फेसबुक स्टेटस ला आपला आम्ही मतदान करणार,विकासाचे भागीदार होणार अशा हॅशटॅगने आपला फोटो ठेवत आम्ही मतदान करणार, आपणही करावे असे अवाहन एकमेकांना करीत आहेत. त्यामुळे येत्या निवडणुकीमध्ये तरुण मतदारांचा सहभाग मोठ्या प्रमाणात असेल असे मत अतिरिक्त आयुक्त करुणा डहाळे यांनी व्यक्त केले. वेगवेगळ्या प्रसार माध्यमांद्वारे आपला सेल्फी काढून व्हायरल केल्यामुळे निवडणुकीबाबत सकारात्मक जागरूकता बघायला मिळाली. यासाठी महानगरपालिका शिक्षण मंडळाचे प्रशासन अधिकारी विश्वंभर दासरवाड यांनी महानगरपालिका क्षेत्रातील मध्यवर्ती असलेल्या शाळांची निवड करून शाळेच्या व्यवस्थापनाला तो सेल्फी पॉईंट शाळेच्या दर्शनी भागात लावण्याबाबत व त्याची देखभाल करण्याबाबत शाळांना सूचना दिलेल्या आहेत.

या सेल्फी पॉइंटची डिझाईन सुनिल देसले यांनी केली असून याचे वितरण व्यवस्थापन शरद पवार, गणेश सूर्यवंशी, एजाज खान पठाण व तेजस सोनवणे यांनी केले आहे .

# नायलॉन मांजाप्रकरणी एकास अटक, शहर डी. बी. पथकाची कारवाई

प्रतिनिधी । नंदुरबार

**दोन दिवसांपुर्वी शहर पोलीस ठाण्याच्या पथकाने नायलोन मांजावर कारवाई करुन सुमारे पावणे सात लाखाचा मुद्देमाल जप्त केला. याबाबत अटकेत असलेल्या इसमाने दिलेल्या माहितीवरुन पथकाने धुळे येथील एकास अटक केली असून त्याच्याकडून ५ लाख २५ हजाराचे नायलोन मांजाचे आठ खोके जप्त केले आहेत.**

शहर पोलीस ठाण्याचे प्रभारी हेमंतकुमार पाटील यांना मिळालेल्या गोपनिय माहितीचे आधारे नंदुरबार शहर डी. बी. पथकाने शहरातील बाहेरपुरा भागातून एक मांजाचा मुद्देमाल असलेल्या टेम्पोचा शोध घेत त्यातुन प्रतिबंधीत असलेल्या नायलॉन मांजाचे एकुण ६० प्लॅस्टीकचे रिल व वाहन असा मिळून एकूण ६ लाख ७० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करुन कल्पेश उमेश जावरे (वय २५ वर्षे, रा.जुनी भोई गल्ली, नंदुरबार) याला ताब्यात घेण्यात आले असून त्याच्याविरुध्द नंदुरबार शहर पोलीस ठाण्यात भा. न्या. संहिता कलम ११०, २२३ सह पर्यावरण संरक्षण अधि. कलम ४, ५,१५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयात आरोपी कल्पेश जावरे यास न्यायालयाकडून पोलीस कस्टडी रिमांड देण्यात आली होती. सदर आरोपी पोलीस रिमांडमध्ये असतांना त्यास तपासादरम्यान विश्वासात घेऊन सदरचा माल कोठून आणला बाबत विश्वासात घेऊन विचारपुस करता त्याने माल हा धुळे येथील इसम रहेमान अखलाक अहमद, (वय ३४ वर्षे, रा. अकबर चौक, धुळे) याच्याकडुन मागवला असल्याबाबतची कबूली दिली.

# शहरात आज नो फ्लायिंग झोन घोषित

प्रतिनिधी ।धुळे

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा गुरुवार दि. ८ जानेवारी रोजी धुळे जिल्हा दौरा नियोजित असून शहरातील विविध कार्यक्रमांना ते उपस्थित राहणार आहेत. सुरक्षेच्या दृष्टीने दि. ८ जानेवारी रोजी धुळे शहर व धुळे तालुका हद्दीच्या परिसरात ड्रोन उड्डाणास बंदी घालण्यात आली आहे. याबाबतचे आदेश पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी निर्गमित केले आहेत. कार्यक्रमांच्या अनुषंगाने व सुरक्षेच्या दृष्टीने ८ जानेवारी रोजी सकाळी १० ते रात्री १० वाजेपर्यंत आदेश लागू करण्यात आले आहे.

# सैन्यदलात अधिकारी पदाचे पूर्व प्रशिक्षण सत्रासाठी विद्यार्थ्यांची १२ रोजी निवड

प्रतिनिधी । धुळे

**भारतीय सशस्त्र सैन्यदल, नौदल व वायुदलामध्ये अधिकारी पदावर भरती होण्यासाठी पात्र उमेदवारांना कंपाउंड डिफेन्स सर्व्हिस (सीडीएस) या परीक्षेच्या पूर्व तयारीसाठी छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक येथे प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे.**

या प्रशिक्षण सत्रासाठी विद्यार्थ्यांची निवड करण्यासाठी दि. १२ जानेवारी रोजी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, धुळे येथे इच्छुकांनी मुलाखतीसाठी उपस्थित रहावे. असे आवाहन जिल्हा सैनिक अधिकारी मेजर डॉ. निलेश पाटील (नि.) यांनी केले आहे.

या परिक्षेची पूर्व तयारी करून घेण्यासाठी छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक येथे महाराष्ट्र शासनातर्फे युवक व युवतींसाठी १९ जानेवारी ते ३ एप्रिल या कालावधीत सीडीएस कोर्स साठी प्रशिक्षण देण्यात येईल. प्रशिक्षण कालावधीत प्रशिक्षणार्थींना निवास, भोजन आणि प्रशिक्षण निःशूल्क उपलब्ध करुन देण्यात येते. धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील पात्र विद्यार्थ्यांनी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, धुळे येथे १२ जानेवारी रोजी सकाळी १०.३० वाजता मुलाखतीस उपस्थित रहावे. विद्यार्थ्यांनी कोर्ससाठी प्रवेशपत्र व त्यासोबत असलेली परिशिष्टांची प्रिंट घेऊन ते पुर्ण भरुन दोन प्रती सोबत आणाव्यात. सीडीएस वर्गामध्ये प्रवेशासाठी उमेदवार हा कोणत्याही शाखेचा पदवीधर असावा. उमेदवाराने युपीएससी नवी दिल्ली यांचे मार्फत घेण्यात येणाऱ्या सी.डी.एस. या परीक्षेकरीता ऑनलाईन अर्ज केलेला असावा.

# आपत्कालीन परिस्थितीत मदतीसाठी सज्ज राहावे

## • निवासी उपजिल्हाधिकारी शरद पवार यांचे प्रतिपादन; आपदा मित्र- सखी प्रशिक्षणाचा समारोप

प्रतिनिधी । धुळे

**गेल्या काही वर्षांत जागतिक तसेच देशपातळीवर नैसर्गिक आपत्तींमध्ये वाढ होत आहे. अशा परिस्थितीत आपत्ती व्यवस्थापनाचे शास्त्रीय व व्यावहारिक प्रशिक्षण आवश्यक आहे. या प्रशिक्षणातून सक्षम होऊन देश, राज्य व जिल्ह्यातील आपत्कालीन परिस्थितीत मदतीसाठी सज्ज राहावे, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी शरद पवार यांनी केले.**



जिल्हाधिकारी, भाग्यश्री विसपुते यांच्या मार्गदर्शनाखाली धुळे जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणामार्फत आपदा मित्र- सखी प्रशिक्षणाच्या दुसऱ्या टप्पाचा समारोप राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण आणि जिल्हा आपत्ती व्यवस्थापन, धुळे यांच्यावतीने जिल्हा क्रीडा संकुल, धुळे येथे निवासी उपजिल्हाधिकारी श्री. पवार यांच्या उपस्थितीत झाला. त्यावेळी ते बोलत होते. या प्रशिक्षणास जिल्हा क्रीडा अधिकारी एम. के. पाटील, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी जितेंद्र सोनवणे, राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण ५ वी बटालियन, पुणे निरीक्षक राहुलकुमार रघुवंशी, सहायक उपनिरीक्षक म्हस्के, एसआरडीएफचे पोलीस निरीक्षक प्रशांत राठोड, पोलीस उपनिरीक्षक सुरेश बगाड, पोलीस उपनिरीक्षक सुरेश संकपाळ, पोलीस उपनिरीक्षक राहुल अवचार, पोलीस हवा हवालदार गिरी, गणेश जावडे आदी उपस्थित होते. जावडे निवासी उपजिल्हाधिकारी श्री. पवार म्हणाले की, विविध प्रकारच्या नैसर्गिक आपत्तींना प्रभावीपणे तोंड देण्यासाठी योग्य प्रशिक्षण आवश्यक आहे. या प्रशिक्षणामुळे आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांना मदत करण्यासाठी आवश्यक कौशल्ये व आत्मविश्वास प्राप्त होतो. धुळे जिल्ह्यात दुसऱ्यांदा आपदा सखी व आपदा मित्र प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात आला असून, यात स्वयंसेवकांना प्रत्यक्ष कृतीवर आधारित प्रशिक्षण देण्यात आले आहे. या प्रशिक्षणासाठी जिल्ह्यातून एकूण ८० आपदा सखी व आपदा मित्र सहभागी झाले होते. भविष्यात कोणतीही आपत्ती उद्भवल्यास प्रशासनासोबत प्रशिक्षित स्वयंसेवकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून विशेषतः तरुण वर्गाचा सहभाग आपत्ती व्यवस्थापनात निर्णायक ठरेल, असेही त्यांनी नमूद केले.

या प्रशिक्षणात प्रथमोपचार, सीपीआर, शोध व बचाव कार्य, बोट चालविणे आदी विषयांवर प्रशिक्षण देण्यात आले. नकाणे तलाव येथे बोट प्रशिक्षण घेण्यात आले असून यामध्ये एसआरडीएफ धुळे येथील अधिकारी व जवानांनी सहकार्य केले. एनडीआरएफ व एसआरडीएफच्या कार्याचे निवासी उपजिल्हाधिकारी श्री. पवार यांनी विशेष कौतुक केले.

# मतमोजणी केंद्र परिसरात मनाई आदेश लागू

प्रतिनिधी । धुळे

महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीची रणधुमाळी आता अंतिम टप्प्यात आली असून, प्रशासनाने मतमोजणी प्रक्रियेसाठी कंबर कसली आहे. मतमोजणीच्या दिवशी कोणताही अनुचित प्रकार घडू नये आणि कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी राज्य वखार महामंडळ आणि मार्केट यार्ड परिसरात प्रशासनाकडून कडक मनाई आदेश लागू करण्यात आले आहेत.

येत्या १५ जानेवारी रोजी मतदान प्रक्रिया पार पडणार असून, १६ जानेवारी रोजी मतमोजणी होणार आहे. बाजार समितीच्या आवारातील वखार महामंडळाच्या गोदामात ही मतमोजणी पार पडणार आहे. या पार्श्वभूमीवर, खबरदारीचा उपाय म्हणून १४ जानेवारीपासून ते १६ जानेवारीला मतमोजणीची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत हे मनाई आदेश लागू राहतील.

बाजार समितीचे पश्चिमेकडील आणि उत्तरेकडील प्रवेशद्वार तसेच आजूबाजूचा ५०० मीटरचा परिसर मप्रतिबंधित क्षेत्रफ म्हणून घोषित करण्यात आला आहे. या कालावधीत परिसरात पाच किंवा त्यापेक्षा जास्त व्यक्तींना एकत्र येण्यास सक्त मनाई असेल. मतमोजणी केंद्राच्या परिसरात कोणत्याही प्रकारच्या सार्वजनिक प्रचार सभा किंवा घोषणाबाजी करण्यास बंदी घालण्यात आली आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तींवर कायदेशीर कारवाई करण्याचा इशारा प्रशासनाने दिला आहे.

# पाडळसरे धरण जनआंदोलन समितीकडून कामाची पाहणी

## निम्न तापी प्रकल्प कार्यालयाचे कार्यकारी अभियंता कडलक यांनी उपस्थित पदाधिकाऱ्यांना दिली माहिती

प्रतिनिधी । अमळनेर

**निम्न तापी प्रकल्प पाडळसरे धरणाच्या कामाची पाहणी करण्यासाठी पाडळसरे धरण जनआंदोलन समितीतर्फे प्रत्यक्ष धरणावर भेट देऊन शासनाकडून प्राप्त निधी व खर्चाची माहिती घेत कामाची वस्तुस्थिती संबंधित अधिकाऱ्यांकडून आंदोलनकर्त्यांनी जाणून घेतली.**

निम्न तापी प्रकल्प पाडळसरे धरणाचा प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेत समावेश झाल्यानंतर महाराष्ट्र शासनाच्या प्राप्त निधी व केंद्र सरकारकडून मिळणाऱ्या निधीच्या संदर्भात धरण समिती लोकप्रतिनिधींच्या माध्यमातून पाठपुरावा करीत आहेत. त्यासोबतच धरणाच्या बांधकामाची प्रगती आणि वस्तुस्थिती तसेच पुनर्वसन याबाबतची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी जनआंदोलन समितीच्या पदाधिकारी यांनी प्रत्यक्ष धरणाला भेट दिली. जन आंदोलन समितीचे प्रमुख सुभाष चौधरी, अर्बन बँक संचालक रणजित शिंदे, महेंद्र बोरसे, महेश पाटील, देविदास देसले प्रमुख पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्त्यांनी धरणाचे काम गतिमानतेने व कालबद्ध पद्धतीने व्हावे तसेच बांधकामातील प्रशासनिक, तांत्रिक, आर्थिक अडचणी काय



आहेत याबाबत संबंधित अधिकाऱ्यांशी धरणाच्या बांधकामावर प्रत्यक्ष चर्चा करून माहिती घेतली.

याप्रसंगी झालेल्या बैठकीत निम्न तापी प्रकल्प कार्यालयाचे कार्यकारी अभियंता य.म. कडलक यांनी उपस्थित पदाधिकाऱ्यांना सविस्तर माहिती देताना सांगितले की, धरणाच्या बांधकामाच्या अनेक गोष्टी सोबत करावे लागतात. नाहीतर नुसतं पाणी साठलेले डोळ्याने दिसते पण मिळत नाही. अशी एक परिस्थिती तयार होते, अशी विपरीत परिस्थिती होऊ नये म्हणून आपण एकाचवेळी वेळवेगळ्या पातळ्यांवर ज्या-ज्या गोष्टी शक्य आहेत, त्या करीत आहोत. आम्ही त्या सगळ्या गोष्टींचा टाइमिंग कसा मॅच होईल? म्हणजे पाणीसाठा होईपर्यंत आपल्याला लोकांना पाणीही देता आले पाहिजे, या दृष्टीने काम करतो आहोत. प्रत्यक्ष भूसंपादन, पुनर्वसनासाठी सुद्धा प्रयत्न सुरू आहेत.

धरणाच्या कामात सध्यातरी आपल्याला कुठलीही तांत्रिक अडचण नाही. नदी सहा महिने वाहते त्यामुळे कामाला वेळ कमी मिळतो.तरीही धरण बांधकाम पूर्ण क्षमतेने सुरू आहे.महाराष्ट्रात सर्वाधिक मोठे गेट असलेले धरणापैकी एक पाडळसरे धरण आहे.यात तांत्रिक काम असल्याने त्याला वेळ लागतो. एवढं मोठं काम अत्यंत बारकाईने करायचे आहे.असे यावेळी सांगितले.कामावर स्टाफ खूप कमी आहे. आज ना उद्या आम्हाला स्टाफ मिळत जाईल आमचा एक माणूस तीन माणसांचं काम करतोय. असे सांगत शासनाकडून प्राप्त व खर्च झालेल्या निधीची माहिती ही याप्रसंगी उपअभियंता भटूरकर यांच्या उपस्थितीत समितीच्या पदाधिकाऱ्यांना दिली.

याप्रसंगी समितीचे प्रमुख सुभाष चौधरी यांनी सविस्तरपणे समितीची भूमिका मांडली. बैठकीचे सूत्रसंचालन रणजित शिंदे यांनी केले. आभार सुनिल पाटील यांनी मानले.

यावेळी भरतसिंग परदेशी, एन.के. पाटील, ॲड.कुंदन साळुंखे, डॉ.संजय पवार, रहेमतुल्ला पिंजारी, सुशिल भोईटे, प्रसाद चौधरी, सतिष काटे, डी.के. पाटील, प्रविण संदानशिव, पुरुषोत्तम शेटे, ज्ञानेश्वर वारुळे, दिनेश पाटील, गुलाब पाटील, मोहन तिलक, गौतम संदानशिव, रमेश चव्हाण, भगवान कोळी, माधव पाटील, सुपडू बैसाणे, नारायण बडगुजर, संजय सोनवणे आदींसह समितीचे प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### कार्यकारी अभियंत्यांनी मानले आभार...

धरणाच्या कामात प्रशासनाला नेहमीच जनआंदोलन समितीचा विविध टप्प्यांवर सहकार्य लाभले आहे. बऱ्याच ठिकाणी जन आंदोलन प्रकल्पाच्या विरोधात असतात. मात्र, असे खूप कमी प्रकल्प आहेत, ज्या ठिकाणी समिती ही धरणाच्या समर्थनाच्या भूमिकेत आहेत त्यात पाडळसरे जन आंदोलन समिती सदैव धरणाच्या व काम करणाऱ्या प्रशासनाच्या पाठीशी उभी असते ही फार दुर्मिळ गोष्ट आहे. तशी फार सकारात्मक गोष्टी आहे. यासाठी मी शासनाच्यावतीने पाडळसरे धरण जन आंदोलन समितीचे आभार मानतो, असे यावेळी कार्यकारी अभियंता कडलक यांनी सांगितले.

## कंत्राटी कर्मचारी नोकरीत पर्मनंट होणार

प्रतिनिधी । जळगाव

प्रतीक्षेत असलेल्या राष्ट्रीय आरोग्य अभियानातील कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या लढ्याला अखेर मोठे यश आले आहे. आरोग्य सेवेत सलग १० वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त काळ सेवा पूर्ण केलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना कायमस्वरूपी सेवेत समाविष्ट करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या निर्णयामुळे राज्यातील हजारो कर्मचाऱ्यांसह जळगाव जिल्ह्यातील ५०० हून अधिक कर्मचाऱ्यांच्या नोकरीवर असलेली टांगती तलवार दूर झाली होणार आहे.शासनाने हा निर्णय घेतला असला तरी अद्याप अंमलबजावणीला सुरुवात झालेली नाही. शासनाच्या पुढील आदेशानंतर याबाबतची अंमलबजावणी करण्यात येणार असल्याची माहिती जळगाव जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाचे अधिकारी डॉ. सचिन भायेकर यांनी दिली.ज्या कर्मचाऱ्यांनी आरोग्य विभागात कंत्राटी पद्धतीने सलग १० वर्षे पूर्ण केली आहेत, केवळ त्यांनाच या पहिल्या टप्प्यात सामावून घेतले जाणार आहे.

## जामनेरात तलाठ्यास ४ हजार रुपयांची लाच घेतांना अटक; पोलिसात गुन्हा दाखल

### ● उताऱ्यावर नाव नोंद करण्यासाठी मागितली होती लाच

प्रतिनिधी । जामनेर

**तालुक्यातील एका तलाठ्यास ४ हजार रुपयांची लाच स्वीकारताना लाचलुचपत विभागाने रंगेहात अटक केल्याची घटना बुधवार दि.७ जानेवारी रोजी घडली. याप्रकरणी जामनेर पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ च्या कलम ७ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

जामनेर येथील तक्रारदाराने दोन बिनशेतीचे प्लॉट खरेदी



केले होते. त्या प्लॉटच्या फेरफार नोंदी व ७/१२ उताऱ्यावर नाव नोंद करण्यासाठी तलाठी वसीम तडवी याने ५ हजार रुपयांची लाच तक्रारदाराकडे मागितली होती. तडजोडीअंती ४ हजार रुपये स्वीकारण्याचेमान्य केले होते. याबाबत तक्रारदाराने येथील लाचलुचपत विभागाकडे तक्रार केली होती. तक्रारीची खात्री झाल्यावर पोलिस उपअधीक्षक योगेश ठाकूर यांनी तलाठी वसीम तडवीयाने तक्रारदाराकडून ४ हजार रुपये स्वीकारताना रंगेहाथ जेरबंद केले. यावेळी सापळा यशस्वीतेसाठी पोलिस निरीक्षक हेमंत नागरे, बाळू मराठे, भूषण पाटील आदींचा पथकांत समावेश होता.

## जुमलेबाज महाजन दांपत्याने खदानची जागा घातली बिल्डरच्या घशात

### ● प्रभाग १४ मधील मतदारांची दिशाभूल सुरू; उमेदवार अशोक लाडवंजारी यांची घणाघाती टीका

प्रतिनिधी । जळगाव

**माजी महापौर जयश्री महाजन व माजी विरोधी पक्षनेते सुनील महाजन हे दांपत्य प्रभाग क्रमांक १४ मधील नागरिकांची जाणीवपूर्वक दिशाभूल करीत आहेत. निवडणुकीच्या तोंडावर जुमलेबाजी करत असल्याचा गंभीर आरोप प्रभाग १४-अ मधील उमेदवार अशोक लाडवंजारी यांनी केला आहे.**

मेहरून गावठाणातील सर्वे नंबर ४२४ येथील खदानाची जागा सत्तास्थानी असताना एका खासगी बिल्डरच्या घशात घालण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला. अशोक लाडवंजारी म्हणाले की, महाजन दांपत्याकडे एकाच वेळी महापौर व विरोधी



पक्षनेते पद असतानाही तांबापूर-मेहरून परिसरातील नागरिकांसाठी कोणतेही ठोस विकास कामे करण्यात आली नाहीत. सदर गावठाण जागा ताब्यात राहिली असती तर त्या ठिकाणी व्यायामशाळा, वाचनालय किंवा स्वातंत्र्यसैनिक अब्दुल हमीद स्मारक उभारता आले असते. मात्र नागरिकांच्या हिताकडे दुर्लक्ष करून ही जागा खासगी स्वार्थासाठी देण्यात आली. महापालिकेच्या जुन्या भंगार पाईपलाईन चोरीप्रकरणी भाजप आमदार राजूमामा भोळे यांनी आंदोलन करत आवाज उठवला होता. त्या वेळी भाजप पदाधिकाऱ्यांकडून 'बंटी-बबली चोर है' अशा घोषणा देण्यात आल्या होत्या. असे असतानाही भाजपने पुन्हा महाजन दांपत्याला उमेदवारी दिली. आता तेच मतदारांना सातबारा उताऱ्यावर नाव लावून देण्याचे गाजर दाखवत असल्याची टीका अशोक लाडवंजारी यांनी केली आहे. तांबापूर परिसरातील नागरिकांना घरकुल योजनेअंतर्गत मिळणारी २ लाख ४० हजार रुपयांची मदतही महाजन दांपत्य सत्तेत असताना मिळवून देता आली नाही, असेही त्यांनी सांगितले. महापौर पदाचा अधिकार असताना सातबारा लावता आला नाही, तर आता निवडणुकीच्या तोंडावर दिली जाणारी आश्वासने फसवी असल्याचा आरोप करण्यात आला आहे. मेहरून येथील घाडग्याचा तलाव परिसरात खडे प्लॉट पाडून काही लोकांकडून ५० टक्के रक्कम घेतल्याचा आरोप करत, आधी त्या लोकांच्या नावावर सातबारा उतारा लावून दाखवावा, असे खुले आव्हान अशोक लाडवंजारी यांनी सुनील महाजन यांना दिले आहे. 'मतदारराजा सुज्ञ असून या जुमलेबाजीला बळी न पडता निवडणुकीत योग्य धडा शिकवेल,' असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

## थोडक्यात

### राष्ट्रसंत ललित प्रभाजी म.सा. यांचे प्रवचन उत्साहात

**भुसावळ ।** जैन धर्मियांचे राष्ट्रसंत ललित प्रभजी म.सा. यांचे दोन दिवशीय प्रवचन सभा मातृभूमी चौकजवळील संतोषी माता हॉल येथे दि.६ रोजी उत्साहात संपन्न झाले. यावेळी ते प्रवचनात म्हणाले की, जीवनात मदत करणाऱ्या व सदैव साथ देणाऱ्यांचे अवश्य आभार मानल्यास व आपण ज्या परिस्थितीत जीवन जगलो त्यापासून उत्थान करण्यासाठी परमेश्वराकडे साकडे न घालता प्रयत्नच पराकाष्टनेची जोड दिल्यास यश कसे खेचता येऊ शकते याचे उदाहरणे देउन यशस्वी जीवन जगण्याच्या कलेचे महत्त्व पटवून दिले. यावेळी संघपती जयंतीलाल सुराणा, सुगनचंद सुराणा, जे.बी. कोटेचा, गौतम चोरडिया, कांतीलाल चोरडीया, अतुल ताथेड, विशाल चोरडिया, राजेश बाफना, विनोद मेहता, सुरेशचंद कुमट, सुरेशचंद देवडा, मुकेश चोपडा, अमित कोटेचा, राजेश सुराणा, अशोकचंद सुराणा यांच्यासह भाविक उपस्थित होते.

### पूनम फालक यांचा 'शिक्षा शिरोमणी' पुरस्काराने गौरव

**भुसावळ ।** येथील ताप्ती पब्लिक स्कूलच्या आदर्श शिक्षिका व जयलक्ष्मी ॲकेडेमीच्या प्रमुख आधारस्तंभ पूनम विजय फालक यांना वर्ल्ड सेवन वंडर्स रेडियन्ट टॅलेंट बुक ऑफ रेकॉर्ड या नामांकित संस्थेद्वारे शिक्षा शिरोमणी पुरस्काराने गौरवण्यात आले. नागपूर येथे श्रीमंत राजे मुधोजीराव भोसले, तानाजी मालुसरे यांचे वंशज सुभेदार कुणाल मालुसरे, प्रा.डॉ. रूपाली वशिष्ठ, डॉ. पंढरीनाथ रोकडे, चंद्रपाल चौकसे, युधिष्टीर राणा, डॉ.दिगंबर तायडे, डॉ.ॲड. क्रांती महाजन, आशा महाजन यांच्याहस्ते हा पुरस्कार देण्यात आला.

## जामनेर नगरपालिका गटनेतेपदी संध्या पाटील यांची निवड

प्रतिनिधी । जामनेर

**नगरपालिकेतील भाजपा नगरसेवकांच्या गटनेतेपदी भाजपाच्या संध्याताई जितेंद्र पाटील यांची बिनविरोध निवड करण्यात आली. मंगळवारी जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये जिल्हाधिकारी डॉ. रोहन घुगे, नगराध्यक्ष साधना महाजन व सर्व नगरसेवक, नगरसेविकांच्या उपस्थितीत ही बिनविरोध निवड जाहीर करण्यात आली.**

जिल्हाधिकारी डॉ. घुगे यांनी नवनिर्वाचित गटनेत्या संध्या पाटील यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. राज्याचे आपत्ती व्यवस्थापन मंत्री ना. गिरीश महाजन यांचे अत्यंत निकटवर्तीय मानले जाणारे शिक्षण संस्थेचे सचिव जितेंद्र रमेश पाटील यांच्या संध्या पाटील या पत्नी आहेत. गेल्या पंचवार्षिक निवडणुकीतही त्या नगरसेविका म्हणून विजयी झाल्या होत्या. बांधकाम सभापती म्हणून त्यांच्याकडे पदभार दिल्यावर शहरात विविध विकास कामे त्यांनी केली होती. म्हणून त्यांच्याकडे यावेळी गटनेते म्हणून मोठी जबाबदारी देण्यात आली आहे. जामनेर नगरपालिकेत यावेळी २६ पैकी भाजपाचे २२ नगरसेवक विजयी झाले असून यामध्ये १३ महिला नगरसेविका आहेत.

## जे. टी. महाजन तंत्रनिकेतनमध्ये स्नेहसंमेलनाचे उद्‌घाटन

प्रतिनिधी । न्हावी

**जे.टी. महाजन तंत्रनिकेतन न्हावी मार्ग, फैजपूर येथे आयोजित स्नेहसंमेलनानिमित्त मान्यवरांना आवश्यक ती मदत व सहकार्य करण्यात आले. याच पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेचे प्रतीक असलेल्या सृजन २०२६ या स्नेहसंमेलनाचे उद्‌घाटन उत्साहात पार पडले.**

सृजन या शब्दाचा मराठीत अर्थ निर्मिती, घडवणे, उत्पत्ती किंवा काहीतरी नवीन निर्माण करण्याची क्रिया असा असून, त्यामध्ये सर्जनशीलता व उत्पत्तीचा भाव दडलेला आहे. सृष्टीची निर्मिती किंवा नवीन काहीतरी घडवण्याचा प्रयत्न या भावनांचे प्रतीक म्हणून या स्नेहसंमेलाचे नाव ठेवण्यात आले आहे. उत्पत्ती, घडण, रचना व सर्जन हे या शब्दाचे



समानार्थी शब्द होत. या कार्यक्रमाचे अध्यक्ष उल्हास चौधरी होते. कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष शरद महाजन, शशिकांत चौधरी, प्रभाकर सरोदे, विजयकुमार परदेशी, नारायण झांबरे, भरत चौधरी, लखिचंद बोरोले यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाला प्राचार्य पी. एम. राणे, सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक, शिक्षकेतर व इतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते सृजन २०२६ स्नेहसंमेलाचे औपचारिक उद्‌घाटन करण्यात आले. गॅदरिंगच्या आयोजनासाठी मान्यवरांना व पाहुण्यांना आवश्यक ती मदत व सहकार्य करण्यात आले. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थितांची मने जिंकली. मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेचे कौतुक करत अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधला जातो, असे मत व्यक्त केले.

## श्री क्षेत्र सुकेश्वर येथील गोशाळेला जि.प.च्या संवर्धन विभागाची भेट

प्रतिनिधी । रवंजे, ता.एरंडोल

**येथून जवळच असलेल्या श्री क्षेत्र सुकेश्वर येथील श्रीकृष्ण गोपाल गोशाळेला जिल्हा परिषद संवर्धन विभागाचे डॉ. सहायक आयुक्त अशोक महाजन पशुसंवर्धन विभाग धरणगाव, पशुधन विकास अधिकारी डॉ.अविनाश रणवीर, राहुल साळुंके यांनी भेट दिली.**

डॉ.अशोक महाजन यांनी परिपोषण योजनांबाबत मार्गदर्शन केले. गोशाळेतील देशी गाई व जर्सीगायींची लहान वासरे यांची टॅग केल्याबाबत माहिती व तपासणी केली. दर तीन महिन्यांनी जंतूनाशक गोळ्या देणे व नियमित तपासणी करणेबाबत सूचना दिल्या. गोशाळेच वातावरण, मंदिर परिसर व गायीबद्दल माळी साहेब यांनी समाधान व्यक्त केले.

## करुणा व सामाजिक बांधिलकीने नववर्षाची सुरुवात

### ● मध्य रेल्वे महिला कल्याण संघटना भुसावळचे दोन महत्त्वपूर्ण कल्याणकारी उपक्रम

प्रतिनिधी । भुसावळ

**नववर्षाची सुरुवात करुणा आणि सामाजिक जबाबदारीच्या भावनेने करत, मध्य रेल्वे महिला कल्याण संघटना भुसावळ यांनी समाजातील दुर्बल घटकांच्या उन्नतीसाठी तसेच सर्वसमावेशक विकासाविषयीची आपली बांधिलकी अधिक दृढ करण्याच्या उद्देशाने दोन महत्त्वपूर्ण कल्याणकारी उपक्रम राबविले.**

या प्रसंगी मध्य रेल्वे महिला कल्याण संघटना भुसावळच्या अध्यक्षा तसेच संघटनेच्या सदस्यांनी जळगाव जिल्ह्यातील जामुनझिरा गावाला भेट देऊन आदिवासी समाजासाठी सामुदायिक कार्यक्रम आयोजित केला. या उपक्रमांतर्गत



आदिवासी महिलांना सॅनिटरी पॅड्सचे वितरण करण्यात आले, ज्यामुळे मासिक पाळीविषयक आरोग्य, स्वच्छता जनजागृती व सन्मान यांना चालना मिळाली. ग्रामीण व आदिवासी भागांमध्ये महिलांच्या आरोग्याशी संबंधित हा महत्त्वाचा विषय अनेकदा दुर्लक्षित राहतो, त्या पार्श्वभूमीवर हा उपक्रम अत्यंत उपयुक्त ठरला. यासोबतच डाळी, तांदूळ, बिस्किटे व कचोरी यासारख्या अत्यावश्यक अन्नधान्याचेही वितरण करण्यात आले, ज्यामुळे आदिवासी समाजाला तात्काळ पोषणात्मक मदत मिळाली. या उपक्रमामुळे आरोग्यविषयक सवयी सुधारण्यास, जनजागृती वाढविण्यास तसेच समाजाशी विश्वास व सहभाग अधिक दृढ होण्यास सकारात्मक परिणाम होण्याची अपेक्षा आहे. यामुळे तळागाळातील स्तरावर काळजी, समावेशन आणि सामाजिक बांधिलकीचे महत्त्व अधोरेखित झाले आहे. याच अनुषंगाने, मध्य रेल्वे महिला कल्याण संघटना भुसावळ अध्यक्षा श्रीमती रेखा अग्रवाल यांच्या मार्गदर्शनाखाली क्षितिज स्पॅस्टिक सेंटर येथे गणवेश वितरणाचा एक अर्थपूर्ण उपक्रम राबविला. विशेष गरजा असलेल्या मुलांना दिलेले हे गणवेश केवळ वस्त्र नसून, ते सन्मान, समानता आणि प्रोत्साहनाचे प्रतीक आहेत. या उपक्रमामुळे मुलांचा आत्मविश्वास वाढण्यास, आपलेपणाची भावना निर्माण होण्यास तसेच त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी पोषक व समावेशक वातावरण निर्माण होण्यास मदत होते. अशा उपक्रमांमुळे विशेष गरजा असलेल्या मुलांच्या सक्षमीकरणात मोलाची भूमिका बजावली जाते आणि त्यांच्या अधिक आत्मविश्वासपूर्ण व समाधानकारक जीवनप्रवासाला आधार मिळतो. या उपक्रमांद्वारे मध्य रेल्वे महिला कल्याण संघटना भुसावळ यांनी सामाजिक कल्याण, महिला सक्षमीकरण आणि सर्वसमावेशक काळजीप्रती आपली निष्ठा पुन्हा एकदा अधोरेखित केली असून, नववर्षाची सुरुवात अर्थपूर्ण कृती आणि समाजावर दीर्घकालीन सकारात्मक प्रभाव टाकणाऱ्या उपक्रमांनी केल्याचे स्पष्ट केले आहे.

## क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांना कुऱ्हा हरदो जि.प. शाळेत अभिवादन



प्रतिनिधी । बोदवड

**तालुक्यातील जि.प. उच्च प्राथमिक शाळा कुऱ्हा हरदो येथे क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त प्रतिमेस छाया बहुरूपे यांनी पुष्पहार अर्पण केला.**

मुख्याध्यापक गजानन कोठाळे यांचे मार्गदर्शन लाभले. बालिकादिनानिमित्त शाळेतील विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले यांचा जीवनपट त्यांच्या भाषणातून मांडला. विद्यार्थ्यांनी सावित्रीबाईंच्या जीवनावर आधारित गीतगायन केले. एकांकिका सादरीकरण, स्वरचित गीत सादर केले. इ.६ व ७वीच्या विद्यार्थिनींनी फुले सावित्री नसते तर मुलगी शिकली असती का? या गाण्यावर नृत्य सादरीकरण केले. या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक व सामाजिक मूल्य अधिक वृद्धिगत होतील, अशी अपेक्षा करण्यात आली. गावातील प्रतिष्ठित मंडळी यांनी उपस्थिती दर्शविली व विद्यार्थ्यांसमोर मनोगत देखील व्यक्त केले. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देत त्यांना बक्षीस दिले. 'लेक वाचवा लेक शिकवा' या उपक्रमांतर्गत बालिकादिनानिमित्त सावित्रीबाई फुले यांनी स्त्री शिक्षणासाठी केलेले अथक प्रयत्न, विद्यार्थ्यांना शिक्षण हे किती महत्त्वाचे आहे. त्यामुळे आयुष्य कसे बदलू शकते याचे महत्त्व विविध उदाहरणांच्या माध्यमातून शाळेतील शिक्षिका डॉ.वैशाली संसारे, कुमुदिनी माहुरे, पूनम वाघोदे यांनी पटवून दिले.